पोलीस अधीक्षक कार्यालय, गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O. OFFICE GADCHIROLI
PHONE NO. 07132223142
E-MAIL : prospoffice.gadchiroli@gmail.com
E-MAIL : progadpolice@mahapolice.gov.in

वार्तापत्र

दिनांक- २८/०७/२०२६

पोमके फुलणार हद्दीत माओवादी असल्याचे भासवून बॅनर व पत्रके टाकून दहशत निर्माण करणाऱ्या आरोपींना गडचिरोली पोलिसांनी केली अटक

- **नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्याच्या प्रयत्नाविरोधात गडचिरोली पोलीस दलाकडून सलग दुसऱ्यांदा कठोर कारवाई**
- **नक्षल सप्ताह व माओवादाच्या नावाखाली नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या भूलथापांना बळी पडू नये... पोलीस अधीक्षक श्री. एम. रमेश**

गडचिरोली जिल्ह्यातील माओवाद संपुष्टात आला असून गडचिरोली पोलीस दलाच्या अभिलेखावर एकही माओवादी शिल्लक नाही. गेल्या काळात गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने सातत्याने अभियान राबविण्यात येऊन **"ऑपरेशन अंतिम प्रहार"** च्या माध्यमातून विशेष शोध मोहीम राबवून गडचिरोली जिल्ह्यातील माओवाद्यांची दहशत संपुष्टात आणली आहे.

दि. २५/०७/२०२६ रोजी पोस्टे पिपली बुर्गी हद्दीत माओवादी असल्याचा बनाव करुन बॅनर व पत्रके टाकणाऱ्या आरोपींना गडचिरोली पोलीस दलाने अटक करून कठोर कारवाई केली असतानाच दि. २५/०७/२०२६ रोजी काही अज्ञात व्यक्तींकडून माओवादी असल्याचे भासवून नागरिकांच्या मनात भीती निर्माण करण्याच्या उद्देशाने पोमके फुलणार हद्दीत पत्रके व बॅनर लावण्यात आले होते. मात्र याबाबत देखील गडचिरोली पोलीस दलाकडून तात्काळ कारवाई करण्यात येवून सदर दहशत निर्माण करणाऱ्या सहा आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्यात आली आहे.

सविस्तर वृत्त असे आहे की, दि. २५/०७/२०२६ रोजी पोमके फुलणार पासून साधारण ८ किमी अंतरावर हिद्दुर- दोबुर मार्गावर दोन झाडांदरम्यान एक लाल रंगाचे कापडी बॅनर तसेच एक पांढऱ्या रंगाचे कागदी पोस्टर मिळून आले होते. सदर पोस्टर व बॅनरवर नागरिकांच्या मनात भीती निर्माण करण्याच्या उद्देशाने मजकुर लिहण्यात आला होता. सदर बाबीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री. एम. रमेश यांच्या आदेशान्वये आरोपींचा शोध घेणेकामी जलद गतीने तपास सुरु करण्यात आला होता. यावरून दि. २५/०७/२०२६ रोजी पोस्टे कोठी येथे अप. क्र. ०३/२०२६ कलम ३५३(१) (ब), १८९(२), १९०, ६१(२) भा.न्या.स., कलम १०, १३, २०, ३९ बेकायदा कृत्य अधि. व कलम १३५ महा. पो. अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली तातडीने आरोपींचा शोध घेणे कामी शोध मोहिम राबविण्यात आली असता सदर तपासादरम्यान तांत्रिक पुरावे व गोपनिय बातमीदारांकडून प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी नामे १) **जोगा रैनु धुर्वा, वय ४० वर्ष, रा. मिरगुळवंचा ता. भामरागड जि. गडचिरोली** २) **मालु कांडे धुर्वा, वय ४२ वर्ष रा. मिरगुळवंचा ता. भामरागड जि. गडचिरोली** ३) **दलसु मर्रा तेलामी, वय ५० वर्ष, रा. कृष्णार ता. भामरागड, जि. गडचिरोली** ४) **चैतु डूंगा धुर्वा, वय ५३ वर्ष रा. दोबुर ता. भामरागड जि. गडचिरोली** ५) **गणेश देवू आलामी, वय ४० वर्ष, रा. पोयारकोठी ता. भामरागड जि. गडचिरोली** ६) **राजेश दल्लु वड्डे, वय ३२ वर्ष, रा. मिरगुळवंचा ता. भामरागड जि. गडचिरोली** यांनी नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने माओवादी असल्याचे भासवून सदर पत्रके व बॅनर लावल्याचे निष्पन्न झाले होते. यावरून गडचिरोली पोलीसांनी सदर सहा आरोपींना अटक केली असून इतर आरोपींचा शोध सुरु आहे.

पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांनी सदर कारवाईत सहभागी अधिकारी व अंमलदार यांचे कौतुक केले असून नागरिकांना आवाहन केले आहे की, 'नक्षल सप्ताह व माओवादाच्या नावाखाली नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या भूलथापांना बळी पडू नये. अशा प्रकारच्या कोणत्याही बेकायदेशीर कृत्यात नागरिकांनी सहभागी होवू नये.' याप्रकारे कोणीही नागरिकांमध्ये भिती व दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्याविरुध्द कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचेही पोलीस अधीक्षक यांनी सांगितले आहे.